|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

A Grade
NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**विद्यार्थी विकास विभाग**

☎ 0257-2257418,419 FAX - 0257-2258403,406 Email- sw@nmu.ac.in Website- nmu.ac.in

जा.क्र.उमवि/14/विवि-20/239 /2017 दि.04/09/2017

प्रति,
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा यांचे मा. संचालक/विभाग प्रमुख यांना -**

विषय:- विद्यापीठस्तरीय आपात्कालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळेच्या सहभागाबाबत.....
संदर्भ:- विद्यापीठाचे पत्र क्र.उमवि/14/विवि-20/238 /2017, दि.04/09/2017

महोदय / महोदया,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरीता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शने आयोजित केली जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा, त्यास सभोवतालचे वातावरण अवगत व्हावे, श्रमसंस्कृतीची जाण व्हावी, सांस्कृतिक कला जोपासली जावी असा प्रयत्न विभागाद्वारे केला जात आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी **विद्यापीठस्तरीय आपात्कालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळेचे** आयोजन **दि. 13 ते 15 सप्टेंबर, 2017** या कालावधीत **श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि.धुळे** येथे आयोजित करण्यात येत आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपात्कालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळेत विद्यार्थ्यांना समाजाप्रती भूमिका व निरनिराळ्या समस्यांमध्ये अथवा संकटकाळामध्ये निर्णय क्षमता वाढीला लागणे हे गरजेचे आहे. निसर्ग निर्मीत संकटांमध्ये उदा. पूर, आग लागणे, भूकंप तसेच मानव निर्मीत दंगली, युध्द यासारख्या आणीबाणीच्या प्रसंगी जीवीत व वित्त हानीपासून संरक्षण करणे आवश्यक असते. सकारात्मक कर्तव्याची भावना वाढीस लागावी व समाजाचे रक्षण करुन आदर्श युवक निर्माण व्हावेत या उद्देशाने या क्षेत्रातील तज्ञांना बोलावून मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यासाठी आपल्या महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा विभाग मधील खालील निकषानुसार **06 विद्यार्थी (3 विद्यार्थी व 3 विद्यार्थिनी)** निवड करून पाठवावेत, ही विनंती.

* सदर विद्यार्थी गुणवत्ताधारक, आज्ञाधारक, कुशल, बोलका, तात्काळ निर्णय घेणारा, विषयाचे ज्ञान व नेतृत्व गुण क्षमता इ. नैपुण्य असलेला असावा.
* सदर विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात (सन 2017-18) नियमित शिक्षण घेणारा असावा. त्याच्या/तिच्याकडे अद्यावत (प्राचार्य/संचालक यांच्या सही व शिक्का असलेले) ओळखपत्र असावे.
* सदर विद्यार्थी-विद्यार्थिनीने यापूर्वी विद्यापीठ / राज्य /राष्ट्रीय स्तरावरील श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळेत सहभाग घेतलेला नसावा.

कृपया निकषानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवास, चहा, अल्पोहार व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत नि:शुल्क केली जाईल. मात्र त्यांचा येण्याजाण्याचा प्रवासखर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावा.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना :-**
* आपात्कालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळा उद्घाटन सोहळा दि. 13 सप्टेंबर, 2017 रोजी सकाळी 9.30 वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकाळी 9.00 वाजेपर्यंत कार्यशाळा स्थळी उपस्थित राहाणे अगत्याचे आहे.
* कार्यशाळा कालावधी 3 दिवसांचा असल्याने विद्यार्थ्यांनी गरजेनुसार आवश्यक साहित्य, पाणी बॉटल, पांघरुण, गरम कपडे, बॅटरी, कापडी बुट-मोजे तसेच गरजेनुसार आवश्यक औषधी सोबत आणावी. कृपया विद्यार्थ्यांनी मौल्यवान वस्तू / मोबाईल वा गरजेपेक्षा अधिक रक्कम सोबत आणू नये.

* कार्यशाळेला केवळ 03 विद्यार्थी व 03 विद्यार्थिनी यांचीच निवड करुन त्यांना पाठवावे. निर्धारीत संख्येपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. कार्यशाळेत 03 विद्यार्थी व 03 विद्यार्थिनी येणे आवश्यक आहे. जर विद्यार्थिनी ऐवजी 06 विद्यार्थी पाठविलेत तर त्यांचा प्रवेश नाकारला जाईल (फक्त मुलींचे महाविद्यालय / परिसंस्था वगळून) याची कृपया नोंद घ्यावी.

* कार्यशाळेत विद्यार्थ्यांची गटवार विभागणी करण्यात येत असल्याने त्यांना मिळालेल्या गटातच प्रशिक्षण व कला सादर करणे बंधनकारक राहिल.

* निवड करण्यात आलेला विद्यार्थी हा/ही महाविद्यालयातील नियमित प्रवेशित असावा/ असावी व त्याच्या/ तिच्या कडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृपया स्पर्धेसाठी पाठवू नये.

* श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा असल्याने कला सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा व आवश्यक साहित्य सोबत आणावे.

* कार्यशाळा कालावधीत मित्र, मैत्रिण अथवा स्थानिक नातेवाईक यांना भेटीसाठी बोलविता येणार नाही. तसेच गैरवर्तन आढळल्यास विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून तात्काळ परत पाठविण्यात येईल.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक माहिती व संपर्कासाठी -**

1. मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, कार्यालय - दूरध्वनी क्र. (02568) 240462, भ्रमणध्वनी क्र.7588318995, 9270534362, ई-मेल pandharinath112@gmail.com or vimalbaipatil@yahoo.co.in,
2. प्रा. दिनेश दयाराम माळी, समन्वयक, विद्यार्थी विकास अधिकारी, भ्रमणध्वनी क्र.9421534386,

उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुन:श्च कळवितो की, आपात्कालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळेत निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि.11/09/2017** पर्यंत **मा. प्राचार्य, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि.धुळे** यांना ई.पत्ता pandharinath112@gmail.com or vimalbaipatil@yahoo.co.in, पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वंयवृत्त विद्यापीठ **www.nmu.ac.in** आणि महाविद्यालय यांच्या www.vupabsdscsakri.com या संकेत स्थळावर भेट दिल्यास उपलब्ध आहे.

कळावे.

आपला विश्वासू,

(प्रा. एस. टी. इंगळे)
**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

* सोबत :- विद्यार्थी स्वयंवृत्त

* प्रत माहितीसाठी :-

1) मा. प्राचार्य, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि.धुळे
2) प्रा. डॉ. जी. बी. चौधरी, अभय युवा कल्याण केंद्र संचलित कला महिला महाविद्यालय, धुळे
3) मा. वित्त व लेखा अधिकारी, उ.म.वि., जळगाव.
4) स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु कार्यालय, उ.म.वि., जळगाव.
5) मा. विभाग प्रमुख, उत्तमविद्या अंक, जनसंवाद पत्रकारिता विभाग, उ.म.वि., जळगाव.
6) मा.जनसंपर्क अधिकारी, उ.म.वि., जळगाव.
7) मा. पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, उ.म.वि., जळगाव.

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

विद्यार्थी स्वयंवृत्त

## विद्यापीठस्तरीय आपात्कालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळा

1) विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :- ------------------------------------------------------------

2) वर्ग -------------

3) जन्म तारीख :- / /

4) शारीरिक दृष्ट्या सक्षम :- होय / नाही

5) रक्त गट :- ------

6) पत्र व्यवहार पत्ता (निवास) :- ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

7) दूरध्वनी क्र. :- ( )

8) भ्रमणध्वनी क्र. :-

09) महाविद्यालय/परिसंस्था/प्रशाळा यांचे नाव :- -------------------------------------------------

10) दूरध्वनी क्र. :- ( )

11) ओळखपत्र क्र. ------------------

12) विद्यार्थी विकास उपक्रम सहभाग :- ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

13) स्वयंपूर्तीने आयोजित कार्यक्रम :- ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

विद्यार्थी / विद्यार्थीनीची सही व नाव

---

### -: पालकाचे संमती पत्र :-

संमती पत्र लिहून देतो/देते की, श्री/सौ./ ------------------------------------------ माझा पाल्य मुलगा/मुलगी नामे - --------------------------------------- हा/ही सदर कार्यशाळेत स्वयंप्रेरणेने व माझ्या सहमतीने सहभागी होत आहे. त्याला/तिला प्रवास व कार्यशाळा सहभाग कालावधीमध्ये शारीरिक दुखापत, मोठी हानी झाल्यास महाविद्यालय/विद्यापीठ यांना जबाबदार धरणार नाही. त्यांच्याकडे कोणताही नुकसान भरपाई व मानहानी दावा करणार नाही.

पालक/वडील/आई यांचे नाव व स्वाक्षरी

---

### -: महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा यांचे शिफारस पत्र :-

विद्यार्थी नाव ------------------------------ हा/ही नियमित शिक्षण घेत असून नमूद माहिती नोंदी प्रमाणे बरोबर आहे. विद्यापीठस्तरीय आपात्कालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी शिफारस करीत आहे.

दिनांक :- / /

विद्यार्थी विकास अधिकारी
नाव व सही

प्राचार्य/संचालक
सही व शिक्का